

विद्यार्थी विकसित भारताचे भविष्य - आमदार शंकर जगताप

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in   रविवार दिनांक 17/08/२०२५   METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 183 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# भारतीय सैन्य दलाच्या शौर्याला सलाम - मुख्यमंत्री

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



मुंबई : ‘ऑपरेशन सिंदूर’ द्वारे भारतीय सैन्य दलाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा निर्धार आणि विचार प्रत्यक्षात उतरवला. पाकिस्तानमधील दहशतवादी ठिकाणे नष्ट करून शत्रूला धडा शिकविला आणि आपल्या शौर्याची जगासमोर प्रचिती दिली आहे.

आजच्या या दहीहंडी उत्सवातून गोविंदा पथकांनी सैन्य दलाच्या शौर्याला सलाम करण्याचे सुंदर काम केले आहे,” असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दहीहंडी उत्सवाच्या निमित्ताने शहर व उपनगरातील विविध कार्यक्रमांना भेट देऊन नागरिकांना शुभेच्छा दिल्या. घाटकोपर येथील लालबहादूर शास्त्री मार्गावर आयोजित दहीहंडी उत्सव प्रसंगी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी उपस्थित सैन्य दलातील जवानांना भेटून संवाद साधला. कार्यक्रमास सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, आमदार प्रवीण दरेकर, आ. राम कदम यांची प्रमुख उपस्थिती होती.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की,“दहीहंडी उत्सवाला उपस्थित असलेल्या सैन्य दलातील जवानांना व त्यांच्या शौर्याला मी मनःपूर्वक सलाम करतो. सामाजिक उपक्रम व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून घाटकोप

र येथील उत्सवाने जे कार्य केले आहे ते उल्लेखनीय आहे. गोविंदा पथकांनी उभारलेले थर सैन्य दलाच्या शौर्यासाठी अर्पण केले आहेत, ही एक प्रेरणादायी बाब आहे.” त्यांच्या हस्ते माजी सैन्य अधिकारी आनंद तिवारी यांचा सत्कार करण्यात आला.

तसेच सामाजिक कार्याबद्दल चेतन शाह व राजेश भीमसरे यांचा देखील गौरव करण्यात आला.

# बेबडओव्होळ ते निगडी पीएमपीएमएल बसचा शुभारंभ

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी - नागरिकांची मागणी आणि मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांच्या यशस्वी पाठपुराव्याने बेबडओव्होळ ते निगडी पीएमपीएमएल बसला शनिवारपासून सुरुवात झाली. खासदार बारणे यांनी बसला हिरवा झेंडा दाखविला. बस सुरू झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

बेबडओव्होळ येथे बेबडओव्होळ ते निगडी पीएमपीएमएल बससेवेचा शुभारंभ संपन्न झाला. यावेळी डेपो मॅनेजर अशोक साबळे, बस चेकर श्रीहरी ढाकणे, संत तुकाराम साखर कारखान्याचे संचालक ह.भ. प. छबन महाराज कडू, शिवसेना तालुका प्रमुख राजाभाऊ खांडभोर, उपतालुका प्रमुख राम सावंत, चंद्रकांत भोते, युवासेना मावळ लोकसभा अध्यक्ष विशाल हुलावळे, युवासेना तालुका प्रमुख राजेश वाघोले,

बेबडओव्होळच्या सरपंच तेजलताई घारे, उपसरपंच ज्योतीताई घारे, त्र्यंबक घारे, नथुराम झांबरे, संदीप ढमाले, भरत घारे, श्रीकांत जाधव, नवनाथ हरपुडे, प्रवीण ढोरे, दिपक घारे, मदन शेडगे व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

बेबडओव्होळ मधील ग्रामस्थांची अनेक वर्षांची बेबडओव्होळ ते निगडी पीएमपीएमएल बस सेवा सुरू करण्याची मागणी होती. त्यानुसार पीएमपीएमएल प्रशासनाला सूचना दिल्या होत्या. आजपासून बेबडओव्होळ ते निगडी ही नवी बससेवा सुरू झाली आहे.

त्यामुळे नागरिकांनी पिंपरी चिंचवड, पुणे शहरात येणे सोपे होईल. ग्रामीण भागात पीएमपीएमएल बससेवेचा विस्तार करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिकेप्रमाणेच पीएमआरडीए देखील पीएमपीएमएलसाठी निधी देणार असल्याचे खासदार श्रीरंग बारणे यांनी सांगितले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

रविवार दिनांक 17/08/२०25

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी 'रोबोटिक्स लॅब' उपयुक्त - शेखर सिंह

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पिंपरी: "विद्यार्थ्यांना विज्ञान, तंत्रज्ञान, नवोन्मेष आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या जगात प्रत्यक्ष अनुभव देत त्यांचे कौशल्य वृद्धिंगत करण्यासाठी रोबोटिक्स लॅब उपयुक्त ठरणार आहे. ही प्रयोगशाळा केवळ तंत्रज्ञान शिकवणारी नाही, तर विद्यार्थ्यांच्या समस्या सोडवणारी, त्यांच्या कल्पकतेला वाव देणारी आणि त्यांना भविष्यातील अर्थव्यवस्थेत आत्मविश्वासाने सहभाग घेण्यास प्रोत्साहन देणारी आहे. या रोबोटिक्स लॅबमुळे विद्यार्थ्यांना रोबोटिक्स, इलेक्ट्रॉनिक्स, प्रोग्रॅमिंगचे प्रशिक्षण देऊन नवकल्पनाना विकसित करणे शक्य होणार आहे," असे प्रतिपादन पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी केले.

पिंपरी चिंचवड सायन्स पार्क येथे लीडरशिप फॉर इक्विटी आणि रोबोटेक्स इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी उभारलेल्या अत्याधुनिक रोबोटिक्स लॅबचे उद्घाटन शेखर सिंह यांच्या हस्ते स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून शुक्रवारी झाले. प्रसंगी सायन्स पार्कचे संस्थापक संचालक प्रवीण तुपे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. श्रद्धा खापरिया, लीडरशिप फॉर इक्विटीचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी मधुकर रेड्डी बानुरी, मुख्य कार्यपालन अधिकारी दामिनी माईनकर, रोबोटेक्स इंडियाच्या कार्यपालन प्रमुख मनीषा सावंत आदी उपस्थित होते.लीडरशिप फॉर इक्विटीने अलीकडेच सायन्स पार्कमध्ये एक अत्याधुनिक कम्प्युटर सायन्स कोडिंग लॅब स्थापन केली आहे. आसपासच्या शाळांमधील विद्यार्थी ब्लॉक-कोडिंग शिकून विविध प्रकल्प व अनिमेशन तयार करत आहेत. आता रोबोटेक्स इंडियाच्या भागीदारीत उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक रोबोटिक्स प्रयोगशाळेमुळे पिंपरी चिंचवडमधील विद्यार्थ्यांना आणखी संधी उपलब्ध होणार आहेत. यामुळे त्यांना रोबोटिक्स व प्रोग्रामिंग अधिक सखोलपणे शिकता येईल. त्यातून ते नवनिर्मिती करू शकतील आणि आपला दृष्टिकोन विस्तारू शकतील," असा विश्वास दामिनी माईनकर यांनी व्यक्त केला. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना रोबोटिक्स स्पर्धांमध्ये सहभागासाठीही प्रशिक्षण दिले जाईल. यात उद्योजगता चॅलेंज, लाईन फॉलोअर, मेझ सॉल्व्हर आणि गर्ल्स फायर फाईट अशा रोमांचक श्रेणीचा समावेश आहे. या स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांची तांत्रिक क्षमता वाढण्याबरोबरच संघभावना, नेतृत्वगुण आणि समस्या सोडवण्याचे कौशल्य विकसित होईल, असे मनीषा सावंत यांनी नमूद केले.

या उपक्रमाचे सातत्य टिकवण्यासाठी शिक्षक प्रशिक्षण व मार्गदर्शन कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. निवडक शाळांतील शिक्षकांना विशेष प्रशिक्षण देऊन ते विद्यार्थ्यांना लॅबमध्ये मार्गदर्शन करतील, ज्यामुळे कार्यशाळा संपल्यानंतरही शिक्षणाची प्रक्रिया कायम राहील आणि दीर्घकालीन परिणाम साधता येईल, असे डॉ. श्रद्धा खापरीया यांनी सांगितले.

# मृत कामगारांच्या कुटुंबियांना प्रत्येकी 10 लाखांची मदत द्या! - आ.अमित गोरखे

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी-चिंचवड शहरातील निगडी परिसरात आज, शुक्रवार, १५ ऑगस्ट रोजी बीएसएनएलच्या इन्स्पेक्शन चेंबरमध्ये ऑप्टिकल फायबरच्या कामादरम्यान तीन कंत्राटी कामगारांचा गुदमरून दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेने परिसरात शोककळा पसरली असून, आमदार अमित गोरखे यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांना ईमेलद्वारे पत्र पाठवून या घटनेची माहिती दिली.या पत्रात त्यांनी मृत कामगारांच्या कुटुंबियांना प्रत्येकी १० लाख रुपयांची आणि जखमींच्या कुटुंबियांना प्रत्येकी 5 लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर करण्याची मागणी केली आहे. या दुर्घटनेत श्री. दत्ता होलारे, लखन धावरे, आणि साहेबराव गिरसेप या तीन निष्पाप कामगारांनी आपले प्राण गमावले. स्वातंत्र्यदिनासारख्या शुभ दिवशी त्यांच्या घरातील आधारस्तंभ गमावल्याने कुटुंबांची अवस्था दयनीय झाली आहे.

गोरखे यांनी आपल्या पत्रात जखमींच्या उपचाराची जबाबदारी सरकारने घ्यावी अशीही मागणी केली आहे. यासोबतच, या घटनेस जबाबदार असलेल्या संबंधित ठेकेदाराला तात्काळ काळ्या यादीत टाकून त्याच्यावर कठोर कारवाई करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी करून त्यांनी पीडित कुटुंबियांना लवकरात लवकर न्याय मिळवून देण्याची मागणी केली आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

रविवार दिनांक 17/08/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# थेरगाव परिसरात तिरंगा रॅली!

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी - स्वातंत्र्यदिनानिमित्त युवासेना पिंपरी-चिंचवडच्या वतीने थेरगाव येथे परिसरात भव्य तिरंगा रॅलीत काढण्यात आली. या रॅलीत मोठ्या संख्येने तरुण सहभागी झाले होते.मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते तिरंगा हातात घेवून रॅलीला सुरूवात झाली. थेरगाव येथील खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या जनसंपर्क कार्यालया पासुन या तिरंगा दूचाकी रॅलीस सुरूवात झाली.दत्तनगर- थेरगांवगावठाण – तापकीर चौक – काळेवाडी फाटा – १६ नंबर – गुजरनगर – गणेशनगर – डांगे



चौक या मार्गाने बाईक रॅली काढण्यात आली. या रॅलीचे नेतृत्व पश्चिम महाराष्ट्र युवासेना सचिव विश्वजीत श्रीरंग बारणे यांनी केले. सुमारे ५०० दुचाकीवर कार्यकर्ते या रॅलीत सहभागी झाले होते.वंदे मातरम, भारत माता की जय... अशा देशभक्तीच्या घोषणांनी थेरगाव परिसर दणाणून गेला. हातात तिरंगा, मनात उत्साह, आणि ओठांवर जयघोष — अशा उत्साहाच्या वातावरणात रॅली काढण्यात आली. राष्ट्रप्रेम, सामाजिक जबाबदारीची ही तिरंगा बाईक रॅली स्वातंत्र्यदिनाच्या उत्सवाला जणू नवचैतन्य देऊन गेली, अशी भावना विश्वजीत बारणे यांनी व्यक्त केली.

# भव्यदिव्य सेटवर चित्रित होणाऱ्या 'घबाडकुंड'चीच हवा

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

आयुष्यात आलेल्या कितीही अडचणी आपण पार करत यशाची शिखर गाठलं असलं तरी एकदातरी आपल्याला लॉटरी लागावी, अचानक खात्यात काहीही न करता बक्कळ पैसा यावा वा एखाद घबाड हाती लागावं असं वाटतं. पण या सगळ्या म्हणायच्या गोष्टी आहेत, खऱ्या आयुष्यात कष्टाशिवाय पर्याय नाही असं म्हणतात तेच खरं. हो. पण एखाद घबाड हाती लागायची इच्छा काही मनातून जात नाही. अशाच प्रकारच्या घबाडाची आणि त्याचा शोध घेणाऱ्यांची गोष्ट 'घबाडकुंड' या आगामी मराठी चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. या चित्रपटाच्या लक्षवेधी शीर्षकासह या चित्रपटाचा भव्यदिव्य, खर्चिक, आणि नेत्रदीपक असा सेट अधिक लक्षवेधी ठरला. अर्थात मोठ्या पडद्यावर हा सेट प्रेक्षकांना नक्कीच खुर्चीत खिळवून ठेवायला मदत करेल.

ॲक्शन, विनोद, रहस्य असा सगळा भरगच्च मसाला असलेला 'घबाडकुंड' चित्रपट सादरीकरणाच्या दृष्टीने प्रेक्षकांसाठी ट्रीट असणार आहे. 'घबाडकुंड' या चित्रपटाची कथा रहस्यमय असून, यात बऱ्याच् चमत्कारीक गोष्टी घडताना दिसणार आहेत. दिग्दर्शक प्रीतम एस.के.पाटील, निर्मिती रसिक कदम आणि सह निर्मात्या स्मिता पायगुडे अंजुटे यांच्या साथीने सस्पेन्स थ्रिलर जॉनर प्रेक्षकांसाठी घेऊन आले आहेत. चित्रपटासाठी पुण्याजवळील खेड-शिवापूर येथे सिनेमाचा सेट उभारला आहे. १० ते १२ हजार स्क्वेअर फुटांच्या जागेवर भव्य सेट उभारण्यात आला आहे. या सेटवर पाण्याची कुंड, खोलवर गेलेल्या विहिरी, पुरातन मंदिरे, गुहा, त्यातून जाण्या-येण्याचे मार्ग यांचा




वापर गूढ निर्माण करणारी रहस्यमय दृश्ये चित्रीत करण्यासाठी केला जाणार आहे.

मराठीत प्रथमच अशाप्रकारे भव्य-दिव्य सेट तयार करण्यात आला आहे.या चित्रपटात रहस्य, थरार, विनोदाच्या जोडीला नात्यांची गुंतागुंतही पाहायला मिळणार आहे. घबाडाचा शोध घेताना अनाहूतपणे एकमेकांवर दाखवला जाणारा अविश्वास आणि त्यातून निर्माण होणारे संशयी वातावरण उत्सुकता वाढवणार आहे. चित्रपटात देवदत्त नागे, कुशल बद्रिके, संदीप पाठक, शशांक शेंडे प्राजक्ता हनमघर, स्मिता पायगुडे-अंजुटे, वैष्णवी कल्याणकर, रॉकी देशमुख, आरोही भोईर, साहिल अनलदेवर आदि कलाकारांची फौज मनोरंजनासाठी सज्ज झाली आहे.व्हेलेंटिना इंडस्ट्रीज लि. चे विशेष सहकार्य लाभलेला 'घबाडकुंड' चित्रपट मराठी, हिंदी, तेलगू अशा तीन भाषांमध्ये प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाच्या लेखनाची जबाबदारी संजय नवगिरे, अक्षय धरमपाल यांची आहे. कलादिग्दर्शन योगेश इंगळे, छायांकन योगेश कोळी तर संकलन सौमित्र धाराशिवकर यांचे आहे. कार्यकारी निर्माता म्हणून आकाश जाधवने बाजू सांभाळली आहे. साऊथचे प्रसिद्ध फाईट मास्टर कार्तिक यांनी या चित्रपटासाठी साहसदृश्याची जबाबदारी सांभाळली आहे.

# दारू पिण्यास पैसे न दिल्याने आईच्या खुनाचा प्रयत्न

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : दारू पिण्यास पैसे न दिल्याने एकाने आईवर चाकूने वार केल्याची घटना सिंहगड रस्त्यावरील सावित्रीबाई फुले वसाहतीत घडली. खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी पर्वती पोलिसांनी मुलाला अटक केली.

कौशल्या पप्पू कांबळे (वय ५५, रा. सावित्रीबाई फुले वसाहत, सिंहगड रस्ता)




असे गंभीर जखमी झालेल्याचे महिलेचे नाव आहे. या प्रकणी कौशल्या यांचा मुलगा कृष्णा (वय ३०) याला अटक करण्यात आली. याबाबत कृष्णाचा मोठा भाऊ बाबासाहेब (वय ३६) याने पर्वती पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी कृष्णा कांबळे याला दारु पिण्याचे व्यसन आहे. तो काही कामधंदा करत नाही. तो दारू पिण्यासाठी सतत पैशांची मागणी करून आईला त्रास देत होता. पैसे न दिल्याने त्याने आईला शिवीगाळ केली. गुरुवारी पहाटे साडेचारच्या सुमारास त्याने आई कौशल्या यांच्यावर चाकूने वार केले. चाकूने छातीमध्ये भोसकले. या घटनेत त्या गंभीर जखमी झाल्या. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. पसार झालेल्या कृष्णा याला पोलिसांनी अटक केली. पोलीस उपनिरीक्षक शेख तपास करत आहेत.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
रविवार दिनांक 17/08/2025
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# नाना काटे यांच्या वाढदिवसानिमित्त भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन

>>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपळे सौदागर : पिंपरी चिंचवड महानगर पालिकेचे माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे यांच्या वाढदिवसानिमित्त भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.रक्तदान शिबीर .आरोग्य शिबीर ,वृक्षारोपण अशा विविध सामाजिक उपक्रमांनी वाढदिवस साजरा करण्यात आला. विठ्ठल उर्फ नाना काटे यांना शुभेच्छा देण्यासाठी राजकीय सामाजिक शैक्षणिक बांधकाम व्यासायिक अशा विविध कार्यक्षेत्रातील सन्माननीय तसेच रहाटणी पिंपळे सौदागर परिसरातील ज्येष्ठ व सामान्य नागरिकांनी शुभेच्छा देण्यासाठी गर्दी केली होती.

यावेळी विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे ,आमदार शंकर जगताप, आमदार शंकर मांडेकर, आमदार अमित गोरखे, माजी आमदार चंद्रकांत मोकाटे, माजी आमदार अश्विनीताई जगताप ,शिवसेना शहराध्यक्ष संजोग वाघेरे पाटील ,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष योगेश बहल, ज्येष्ठ नगरसेवक भाऊसाहेब भोईर, आनंद पिंपळकर तसेच फोनवरून शुभेच्छा देणारे पैकी मावळचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे ,मंत्री अदितीताई तटकरे ,राजेशजी विटेकर, यांनी फोनवरून शुभेच्छा दिल्या.तसेच ज्येष्ठ नगरसेवक भाऊसाहेब भोईर,, वास्तु विशारद आनंद पिंपळकर, कार्याध्यक्ष प्रशांत शितोळे, नगरसेवक अतुल शितोळे, नगरसेवक संतोष कोकणे ,विनोद नढे , राजेंद्र साळुंखे, हरिभाऊ तिकोने, मयूर कलाटे ,राजू बनसोडे ,मोरेश्वर भोंडवे, प्रभाकर वाघेरे, माऊली सूर्यवंशी ,मुरलीधर ढगे, राजेंद्र जगताप, अजित भाऊ गव्हाणे ,चेतन भुजबळ, कैलास बारणे, खंडू शेठ कोकणे, चंद्रकांत तापकीर, मनोहर अण्णा पवार, दिलीप आप्पा काळे, जगन्नाथ साबळे ,श्रीधर वाल्लेकर, बाळासाहेब वाल्हेकर, सतीश दरेकर, निलेश नेवाळे, सागर कोकणे, तानाजी भोंडवे, तानाजी काळे, विशाल काळभोर ,राजू गावडे, श्याम जगताप, तानाजी जवळकर, गोरक्षनाथ पाषाणकर ,सिद्धेश्वर बारणे, सुनील गव्हाणे ,शेखर चिंचवडे ,राजेंद्र चिंचवडे, दत्तात्रय चिंचवडे ,आनंता कोराळे ,विशाल वाकडकर ,आयुष निंबाळकर,र बाबुराव शितोळे, ज्ञानेश्वर कांबळे मुरलीधर ढगे ,राहुल भोईर, माऊली सूर्यवंशी ,हनुमंत भाऊ गावडे ,राजेंद्र जगताप ,नारायण बहिरवाडे ,तुषार तामाने ,जितेंद्र ननाव,रे राम वाकडकर ,शिरीष आप्पा साठे, युवक शहराध्यक्ष शेखर काटे, प्रदीप आबा तापकीर, दीपक भोंडवे, विजुशेठ, जगताप ,शिवाजी पाडूळे ,शरद बारणे ,इरफान सय्यद ,रंजीत कलाटे ,चेतन पवार ,कांतीलाल गुजर ,नाना शिवले विलास पाडळे ,दिलीप बालवडकर, संदीप पवार ,प्रसाद शेट्टी ,श्रीनिवास कलाटे ,प्रसाद कोलते ,नरेश खुळे ,बाबा त्रिभुवन, इन्कम टॅक्स ऑफिसर शर्मा साहेब ,काळू शेठ मतांनी, नरेश वादवाणी, श्री शेठ आस्वानी, पवन शेठ वादवाणी ,प्रकाश सोमवंशी ,उज्वला ढोरे ,सुनील ढोरे ,ह.भ.प. गंभीर महाराज अवचार, विश्वजीत श्रीरंग बारणे, लाला चिंचवडे, मुकुंद कुचेकर, काळूराम कवितके, अरुण तांबे, नवनाथ नढे, प्रशांत सपकाळ, अरुण चाबुकस्वार, संदीप भालके, वर्षाताई जगताप, अनिल जाधव, धनाजी विनोदे, राजू जाधव, संगीता ताई कोकणे ,राजू गावडे, तृप्ती जवळकर ,पुष्पा शेळके, मीनाक्षी उंबरकर, पौर्णिमा पालेकर ,बापू कातळे ,नारायण बहिरवाडे पिंटू चिंचवडे ,सुमित डोळस., सचिन काळे उपस्थित होते .तसेच डॉ डी.वाय.पाटील ब्लड बँक ,वाय सी एम ब्लड बँक ,जनसेवा ब्लड बँक या ब्लूद बंकेनी रक्तदान शिबिराचे आयोजन केले.

# विद्यार्थी विकसित भारताचे भविष्य - आमदार शंकर जगताप

## सचिन साठे सोशल फाऊंडेशन तर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न

>>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पिंपरी - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र करण्याचा संकल्प केला आहे. आजचे पुरस्कार प्राप्त विद्यार्थी हे उद्याच्या विकसित भारताचे भविष्य आहे. गेल्या २१ वर्षांपासून पिंपळे निलख येथील सचिन साठे सोशल फाऊंडेशन विद्यार्थ्यांचा व समाजातील मान्यवरांचा गुणगौरव करून समाजासाठी प्रेरणादायी उपक्रम राबवीत असून ही अभिमानास्पद बाब आहे, असे प्रतिपादन आमदार शंकर जगताप यांनी केले.

सचिन साठे सोशल फाऊंडेशनतर्फे इयत्ता दहावी, बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या मान्यवरांचा सत्कार समारंभ शुक्रवारी (१५ ऑगस्ट) उत्साहात पार पडला. यावेळी भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, माजी आमदार अश्विन जगताप, प्रा. गणेश शिंदे आदी उपस्थित होते.इयत्ता दहावी बारावी मध्ये विशेष प्राविण्य मिळवून उत्तीर्ण झालेले विद्यार्थी तसेच समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या कार्याची दखल घेऊन त्यांचे कौतुक केले पाहिजे. या आदर्श विद्यार्थी, व्यक्तीमुळे इतरांना प्रेरणा मिळते. म्हणून हा गौरव समारंभ आयोजित केला जातो, असे सचिन साठे म्हणाले.शत्रुघ्न काटे म्हणाले, हा गुणगौरव सोहळा विद्यार्थ्यांच्या प्रगतीला प्रोत्साहन देणारा आणि समाजात सकारात्मकतेचा संदेश देणारा आहे. विद्यार्थ्यांनी चिकाटी आणि मेहनतीच्या बळावर हे यश संपादन केलेले आहे. त्यासाठी काटेकोर मेहनत, वेळेचे नियोजन ही विद्यार्थ्यांच्या यशाची गुरुकिल्ली आहे. विद्यार्थ्यांच्या यशाचा सन्मान हा त्यांच्यासाठी मोठी प्रेरणा असून, मला या सोहळ्याचा एक भाग होता आले याचा आनंद आहे, असे श्रेया बुगडे म्हणाल्या.स्व. आमदार लक्ष्मणभाऊ जगताप स्मृती पुरस्कार (इयत्ता बारावी प्रथम क्रमांक – रू. १५,५५५ रोख व सन्मानचिन्ह) वरद मनीष गुप्ता तर , स्व. सुरज काळूराम नांदगुडे स्मृती पुरस्कार (इयत्ता दहावी प्रथम क्रमांक – रू ११,१११ रोख व सन्मानचिन्ह) अवनी सचिन गुंड हिला प्रदान करण्यात आला. तसेच ८५% पेक्षा जास्त गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांना स्मार्टवॉच, सन्मानचिन्ह आणि स्कूल बॅग प्रदान करण्यात आली. तर इयत्ता दहावी आणि बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व स्कूल बॅग देऊन गौरव करण्यात आला.प्रमुख अतिथींच्या हस्ते परिसरातील विविध क्षेत्रातील मान्यवर विष्णुपंत अर्जुन इंगवले, डॉ. राजेंद्र सयाजी कोकणे, बाळासाहेब जगताप, अनंतराव कस्पटे, दत्तात्रय किसन इंगवले, बाळासाहेब करंजुले, सुरेश काशिनाथ चव्हाण, डॉ. संदीप लूनावत, डॉ. संदीप पाटील, माणिक कुटे, सचिन बडगे, संजय काळूराम दळवी, सोमनाथ बाळासाहेब इंगवले, गणेश पंडितराव साठे, अशोक बनसोडे, मैत्री ग्रुप (पिंपळे निलख), शौर्य विशाल इंगवले, डॉ. विजय पाटील (गायन ग्रुप, विशाल नगर), आर्या गवळी यांना शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.या कार्यक्रमाचे आयोजन सचिन मुरलीधर साठे व सचिन साठे सोशल फाऊंडेशन यांनी केले. कार्यक्रमास परिसरातील विद्यार्थी, पालक, नागरिक उपस्थित होते.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968